# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 26.08.2025** **वार- मंगळवार**

---

**<u>गणेशोत्सव</u>**

गणेशोत्सवाच्या चैतन्य पर्वाला उद्यापासून सुरुवात होत आहे. यासाठी पुण्यासह विविध उपनगरं, पिंपरी चिंचवडमध्ये अत्यंत उत्साहाचं वातावरण आहे. पुण्याचा वैभवशाली सार्वजनिक गणेशोत्सव अनुभवण्यासाठी राज्यभरातून तसंच अन्य राज्यातून आणि परदेशातूनही अनेकजण पुण्यात दाखल झाले आहेत. घराघरातही लाडक्या गणरायाच्या आगमनाची जय्यत तयारी सुरू आहे. आज भाद्रपद शुद्ध तृतीयेला घराघरात महिला वर्गांनं हरतालिका पूजन केलं. पुण्यात मानाच्या पाच गणपतींसह विविध मंडळांमध्ये उद्या ढोल ताशाच्या गजरात, गणरायाची प्रतिष्ठापना होईल, पुढचे दहा दिवस पुण्यासह संपूर्ण राज्यात या गणेशपर्वाचा उत्साह असेल.

**<u>शाडूमातीगणेश</u>**

सर्जनशील हातांना संस्काराची जोड देत पर्यावरणपूर्वक गणेशोत्सव साजरा करण्याच्या उद्देशाने कोथरूडमध्ये शाडू मातीच्या गणेशमूर्ती बनविण्याची कार्यशाळा आज आयोजित करण्यात आली होती. कोथरूड विधानसभा भाजप महिला मोर्चाच्या अध्यक्षा हर्षाली माथवड यांच्या पुढाकाराने डहाणूकर मैदानात ही कार्यशाळा पार पडली. कार्यशाळेत लहानग्यांसह पालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

**<u>pcmc</u>**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी आज सकाळी मोशी खाण परिसर तसंच शहरातील प्रमुख गणेश विसर्जन घाटांची पाहणी केली. विसर्जनाच्या दिवशी भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी विसर्जन घाटांवर आवश्यक सोयी-सुविधांसह पुरेशी सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात यावी, असे निर्देश सिंह यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

**<u>अतिरिक्तबस</u>**

गणेशोत्सवाच्या कालावधीत पुणे महानगर परिवहन महामंडळाने  उद्यापासून येत्या ६ सप्टेंबर पर्यंतच्या कालावधीत दोन टप्प्यांत बसच्या ७८८ अतिरिक्त फेऱ्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे. पहिल्या टप्प्यात २९, ३० ऑगस्ट आणि ५ सप्टेंबर या तीन दिवसांत १६८ जादा बस फेऱ्या, तर दुसऱ्या टप्प्यात ३१ ऑगस्ट ते ४ आणि ६ सप्टेंबर या कालावधीत ६२० जादा बस सोडण्याचं नियोजन करण्यात आलं आहे.

**<u>जायका</u>**

पुणे महापालिकेतर्फे नांदेड सिटीमध्ये सुरू असलेल्या मलनि:स्सारण वाहिनीच्या कामादरम्यान मातीचा ढिगारा कोसळून 4 ऑगस्टला एका कामगाराचा मृत्यू झाला होता. त्यानंतर जायकाच्या पथकाने घटनास्थळाची पाहणी केली. त्यावेळी काम करताना सुरक्षेविषयी सर्वतोपरी काळजी घ्यावी अशी सूचना महापालिका आणि संबंधित ठेकेदाराला केली आहे. सुरक्षाविषयक तज्ज्ञही या ठिकाणी लवकरच पाठविण्यात येणार आहे.

**<u>स्थायीसमिती</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीची बैठक प्रशासक शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली आज पार पडली. यामध्ये विविध विषयांना मान्यता देण्यात आली. तसंच शहरात सुरु असलेल्या विकासकामांचा विभागनिहाय आढावाही त्यांनी घेतला.

**<u>जीएसटीपरिषद</u>**

वस्तू आणि सेवा कर  म्हणजे जीएसटी परिषदेच्या निर्णयात कर्करोग उपचारासाठी वापरल्या जाणाऱ्या तसंच इतर जीवनावश्यक औषधांवरील ‘जीएसटी’ कमी करण्यात आली आहे. हा निर्णय रुग्णांसाठी आरोग्य सेवा अधिक परवडणारी आणि सहज उपलब्ध करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल असल्याचं आयएमएनं स्पष्ट केलं असून त ‘जीएसटी’ परिषदेचे आभार मानले आहेत.

**<u>आरोग्यतपासणी</u>**

श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट आणि इंद्राणी बालन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गणेशोत्सवाच्या कालावधीत मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. २८ ऑगस्ट ते पाच सप्टेंबर या कालावधीत सकाळी ११ ते संध्याकाळी पाच या वेळीत हे शिबिर होणार आहे.

**सहयाद्रीरुग्णालय**

यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रियेनंतर आठवड्याच्या आतच पती-पत्नी दोघांचा मृत्यू  झाल्या प्रकरणी आरोग्य विभागाने पुण्यातील सहयाद्री रुग्णालयाला खुलासा करण्याची नोटीस बजावली आहे. पुणे परिमंडळाचे प्रभारी आरोग्य उपसंचालक डॉ. नागनाथ यमपल्ले  यांनी  ही नोटीस दिली आहे. वैद्यकीय निष्काळजीपणाबाबतही चौकशी केली जाणार आहे. शस्त्रक्रियेदरम्यान किंवा उपचारांबाबत काय घडले, याबाबत आता चौकशी होणार आहे.

**सेटनिकाल**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने 15 जून रोजी सेट ही परीक्षा घेतली होती; मात्र दोन महिने उलटूनही याचा निकाल जाहीर न केल्यामुळे, आज अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने विद्यापीठाच्या सेट परीक्षा भवनसमोर धरणे आंदोलन केले. या आंदोलनानंतर विद्यापीठाने 30 ऑगस्ट रोजी निकाल जाहीर करण्याचे लेखी आश्वासन दिले असल्याची माहिती विद्यार्थी परिषदेच्या वतीने देण्यात आली. या आंदोलनात प्रामुख्याने सेट परीक्षेचा निकाल तातडीने जाहीर करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी बोलताना अभाविपचे पश्चिम महाराष्ट्र प्रदेश मंत्री, अथर्व कुलकर्णी म्हणाले, "विद्यापीठ प्रशासन विद्यार्थ्यांच्या समस्यांकडे दुर्लक्ष करत आहे. आम्ही वेळोवेळी निवेदने देऊनही त्यांनी प्रतिसाद दिला नाही. जर विद्यापीठाने तातडीने निकाल जाहीर केला नाही, तर आमचे आंदोलन सुरूच राहील."

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज पावसाच्या काही हलक्या सरी बरसल्या. उदयाही शहर परिसरात हलक्या पावसाचा अंदाज असून घाट परिसरात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा पुणे वेधशाळेनं दिला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**